साप्ताहिक
भारत सरकार मान्यताप्राप्त

# अनंत विचार

संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com
अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : तिसरे | वार:मंगळवार | दि.२२ ऑक्टोबर २०२४ | किंमत ५ रुपये | पाने : ४ | अंक: ११ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे निर्बंध



सोलापूर : सोलापूर जिल्हयामध्ये विधानसभा निवडणूकची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील तरतुदीनुसार जिल्हादंडाधिकारी,सोलापूर कुम आशीर्वाद (भा.प्र.से.) यांच्या अधिकारान्वये खालीलप्रमाणे निर्बंध घालण्यात येत आहेत.

विधानसभा निवडणूक प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार,निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजातून प्रचार केल्यास ध्वनी प्रदूषण होणे, सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्री पर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालू ठेवण्यावर निर्बंध घालण्यात येत आहेत.

कोणतीही व्यक्ती,संस्था पक्ष कार्यकर्ते यांनी ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकाऱ्याचे परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात. ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. प्रचाराकरीता ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबुनच करावा,फिरणाऱ्या वाहनास रस्त्यावरुन धावत असतांना ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास प्रतिबंध असेल,सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार व इतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनी क्षेपकाच्या वापरासंबंधीच्या परवानगीची माहीती जिल्हादंडाधिकारी,संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

तसेच राजकिय पक्षांनी लढविणाऱ्या निवडणूक उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी मुद्रणालयाच्या मालकांने व इतरमाध्यमाव्दारे छापाई करणाऱ्या म पालकांनी मतपत्रिका छापताना बाबींवर खालील निर्बंध असतील. सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणास प्रतिबंध करण्याबाबत विधान निवडणूकीच्या नगरपालिका सभा कालावधीत नगरपंचायत शासकीय व ग्रामिण भागात निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात सक्षम प्राधिकाऱ्याचे पूर्वपरवानगी शिवाय होर्डींग्ज,बॅनर्स,पोस्टर्स व भिंतीवर जाहिरात प्रदर्शित करण्यास निवडणूक होईपर्यंत २५ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. निवडणूक प्रचार रॅलीमध्ये १० पेक्षा जास्त मोटार गाड्या,वाहने नसावेत व १० गाड्यांमध्ये १०० मिटर अंतर असावे. आदेशाचे उल्लंघन केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार व भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ प्रमाणे दंडनीय कार्यवाहीस पात्र राहतील. असे आदेश जिल्हादंडाधिकारी कुम कर आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## विधानसभेसाठी नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया आजपासून सुरु

सोलापूर – विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल विधानसभेच्या रणधुमाळीला खऱ्या अर्थाने आज मंगळवार २२ ऑक्टोंबर पासून सुरुवात होत आहे. गावोगावी प्रचाराचा धुरळा उडला आहे. गुरुवारी गुरुपुष्यामृत योग असून,अनेकांनी या मुहूर्तावर आपले अर्ज भरण्याची तयारी सुरू केली आहे. प्रशासनानेही उमेदवारी अर्ज दाखल करण्यास होणारी गर्दी लक्षात घेऊन जय्यत तयारी केली असून,सर्व त्या सूचना दिल्या आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यासाठी २२ आक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. उमेदवारी दाखल करण्याची मुदत २९ ऑक्टोबरपर्यंत आहे. ३० ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात येणार आहे. वैध अर्जाची यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत आहे. याच दिवशी चिन्हाचे वाटप करण्यात येणार आहे. यानंतर उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांची धांदल सुरू झाली असून कोणत्याही परिस्थितीत निवडणूक रिंगणात राहण्याचा निर्धार केलेल्यांनी उमेदवारी अर्जासोबतच्या कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांचे जागा वाटप अद्याप जाहीर झालेले नाही. भाजपने जिल्ह्यातील तीन उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. अन्य सर्व पक्षांच्या उमेदवारांची नावे गुलदस्त्यात आहेत. काही ठिकाणी मतदारसंघावरून तर काही ठिकाणी उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे काही उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. काही उमेदवारांनी पक्षाकडून उमेदवारी जाहीर होईल तेव्हा होईल, तोवर अर्ज दाखल करण्याची तयारी केली आहे. उमेदवारी निश्चित असणाऱ्या इच्छुकांनी आवश्यक असणारे दाखले आणि सर्व प्रकारच्या परवानग्याही तयार ठेवल्या आहेत. उमेदवारी अर्ज भरतानाच शक्तीप्रदर्शन करण्याचा निर्धार अनेक उमेदवारांनी केला आहे.

---

## ५० हजारांची लाच घेताना कृषी विभागा तंत्र अधिकारी अटकेत

### खासगी इसमही ताब्यात, शासकीय वाहनात सापडले ६ लाख रुपये

पंढरपूर : खत व शेती औषधे निर्मितीच्या कंपनीत सॅम्पल घेऊन यावर तक्रारदार यांच्यावर कोणतीही कारवाई न करण्याकरिता पन्नास हजाराची लाच घेणाऱ्या पुणे विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील तंत्र अधिकाऱ्यास रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच त्याच्या गाडीत रक्कम ठेवणारा खाजगी इसम आणि गाडीतील सहा लाख १४ हजाराची रक्कम ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतली आहे. आलोसे दत्ता नारायण शेटे,वय ४२ वर्षे, पद तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण), नेमणूक विभागीय कृषी सह संचालक कार्यालय पुणे,म्हाडा कॉलनी मोरवाडी,पिंपरी पुणे व खाजगी इसम प्रमोद वाल्मीक सुरवसे,(वय ३९ वर्षे) व्यवसाय शेती,हरीहर महाराज मठाजवळ?

पंढरपूर या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. यातील तक्रारदार यांचे मालकीची खते व शेती औषधे निर्मीतीची कंपनी असून सदर कंपनीतुन उत्पादन झालेले खते व शेती औषधांचे सॅम्पल घेवुन त्यावरुन तक्रारदार यांचे कंपनीवर कोणतीही कारवाई न करण्याकरीता यातील आलोसे दत्ता नारायण शेटे,पद–तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण),नेमणूक विभागीय कृषी सह संचालक कार्यालय पुणे यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,००० रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्वतः स्विकारुन ती लाच रक्कम खाजगी इसम प्रमोद सुरवसे यांचेकरवी त्यांचे शासकीय वाहनामध्ये ठेवली असताना वर नमुद आरोपींना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लाच रक्कम मिळून आलेल्या शासकीय वाहनाची झडती घेतली असता सदर शासकीय वाहनामध्ये लाच रक्कमे व्यतिरिक्त भारतीय चलनी नोटांचे वेगवेगळे एकुण १७ बंडल मिळुन आले असुन त्यामध्ये एकुण ६,१४,०००/–रुपये मिळुन आले आहेत. त्या रक्कमेबाबत आलोसे शेटे यांनी समाधानकारक स्पष्टीकरण न दिलेने सदरची रक्कम जप्त करण्यात येवून वर दोन्ही आरोपी यांचे विरुध्द टेंभुर्णी पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया चालू आहे.

## पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृतीदिन संपन्न

### पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद झालेल्या जवानांना मानवंदना



सोलापूर (प्रतिनिधी): पोलीस स्मृती दिनानिमित्त पोलीस मुख्यालय सोलापूर येथे पोलीस आयुक्तालय, पोलीस अधीक्षक,पोलीस प्रशिक्षण केंद्र केगाव,रा. रा.पोलीस बल गट क्रमांक १० सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज मंगळवारी पोलीस स्मृती दिन संपन्न झाला.

१–९–२०२३ ते ३१–८– २०२४ या कालावधीत देशामध्ये पोलीस दलातील २१६ पोलीस अधिकारी व जवान हे आपले कर्तव्य बजावत असताना शहीद झाले आहेत.त्यांचे हौतात्म्याचे स्मरण करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.यावेळी जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी,पोलीस आयुक्त एम राजकुमार,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,समादेशक पंकज अतुलकर,प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्राचे विजयकुमार चव्हाण,पोलीस उपायुक्त विजय कबाडे,पोलीस उपायुक्त दिपाली काळे,अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर आदी उपस्थित होते.

मुंबई शहरावर सन २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्लयात शहीद झालेले दिवंगत पोशि. राहुल शिंदे यांचे वडिल सुभाष शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना श्रध्दांजली अर्पण केली.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस जिल्हा सत्र न्यायाधीश सलमान आझमी,यांनी २१ ऑक्टोबर पोलीस स्मृतीदिन संदेशाचे वाचन केले.तसेच यावेळी वर्षभरात संपूर्ण देशात आपले कर्तव्य बजावत असताना आपल्या प्राणाची आहुती देवून हौतात्म्य प्राप्त झालेले २१६ पोलीस अधिकारी व जवान यांचे नावाचे स्मरण,वाचन सहायक पोलीस आयुक्त वाहूतक विभाग खिरडकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी करून शोक शस्त्रद्वारे मानवंदना दिली.

## सोशल मीडियावरील आक्षेपार्ह पोस्टवर कारवाई होणार - उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले

पंढरपूर– विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असून, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह पोस्टवरती भारतीय नागरिक सुरक्षा संहितेप्रमाणे कारवाई केली जाणार असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

पोलीस विभागाकडून सोशल मीडियाचे मॉनेटरिंग केले जाणार आहे. कोणत्याही उमेदवाराच्या संबंधित त्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक स्तरावर अवहेलना होईल, अशी आक्षेपार्ह टीकाटिप्पणी करणे, मजकूर, फोटो, व्हिडिओ एडिटिंग, मर्फिंग करून प्रसारित करणे व आलेल्या संदेशावर आपले मत प्रकट करणे व पुढे पाठवणे, म



तदारांचे मन वळवण्यासाठी कोणत्याही धम च्या लोकांना धार्मिक, भाषिक आक्षेपार्ह म जकूर पाठवणे, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा होईल असे स्वतंत्र ग्रुप तयार करून त्यावर आक्षेपार्ह फोटो, व्हिडिओ, मजकूर पाठवणे हे आदर्श आचारसहितेचा भंग ठरते.

आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटात वाद निर्माण होतील, अशा पोस्ट टाकणारा व त्याबरोबर ग्रुप ॲडमिनलाही दोषी ठरवण्यात येईल. त्यासाठी व्हॉट्सअप ग्रुपवरील सेटिंग बदलून ओन्ली फॉर ग्रुप एडमिन करून घेण्यात यावी. सोशल मीडिया वरती कोणत्याही आक्षेपार्ह पोस्ट टाकणे, त्या पोस्टना लाईक करणे, फॉरवर्ड करणे व प्रतिसाद देणे हा कायद्याने गुन्हा असल्याचेही डॉ. भोसले यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी मतदान केंद्रावरती जाऊन प्रत्यक्ष पहाणी केली आहे. निवडणुकीसाठी असणाऱ्या मतदान केंद्रावरती जाण्यासाठी लागणारा प्रतिसाद वेळ व केंद्राच्या एकंदर परिसराचीही त्यांच्याकडून यावेळी पाहणी करण्यात आली. मतदान केंद्र असणाऱ्या इमारतीमध्ये सीसीटीव्ही आहेत का? याचीही माहिती घेण्यात आली.

निवडणुकीच्या मतदानादरम्यान होणारी गर्दी, गर्दीची ठिकाणे, त्यावर नियंत्रण करण्यासाठी उपाय योजना याबाबतचे नियोजन करण्यात आले आहे. मतदाना दरम्यान होणाऱ्या वाहतुकीचे नियंत्रण व त्या मार्गामध्ये कोणते बदल करावे लागतील याबाबतची ही माहिती यावेळी घेण्यात आली. मतदान केंद्रावरती प्रत्यक्ष द्यावयाच्या बंदोबस्ताच्या नियोजनाबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# संपादकीय

## बेस्टच फसलेलं कंत्राटीकरण

गेल्याच आठवड्यात मुंबईकर प्रवाशांसाठी एक वाईट बातमी ठरली. मुंबईकरांच्या जिव्हाळ्याचा व सोयीच्या असलेल्या बेस्ट उपक्रमातील एका खाजगी कंत्राटदाराने आपल्या २८० बस काढून घेण्याचा निर्णय घेतला आणि बेस्टची बस सेवा ठप्प करून टाकली. त्यामुळे पश्चिम उपनगरात राहणाऱ्या अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव विभागातील प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. एका रात्रीत कंत्राटदाराने आपली सेवा अचानक थांबवणे हे अत्यंत धोक्याचे असून कोणतेही योग्य नियोजन न करता बेस्टमध्ये कंत्राटीकरण कशाप्रकारे फसले आहे त्याचे हे योग्य उदाहरण ठरेल. एखाद्या कंत्राटदाराने कंत्राट रद्द करून जाणे हे बेस्टसाठी काही नवीन गोष्ट नाही. याआधी पीएनएम ग्रुप व एम पीजी ग्रुप यांनी कोणत्याही अटी शर्तींचे पालन न करता अचानक बेस्टमधून एक्झिट घेतली होती आता तिसऱ्यांदा हंसा सिटी बस या कंत्राटदाराने एका रात्रीत परवडत नसल्याचे कारण देत आपली बस सेवा अचानक बंद केली त्याने लाखो प्रवाशांचे हाल, तर झालेच; परंतु त्यात काम करणारे बाराशे कर्मचारी एका रात्रीत बेरोजगार झाले. तसेच आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे बेस्टमधील आणखी एक कंत्राटदार दिवाळीनंतर आपली बस सेवा थांबवणार असल्याचे कळते आहे. त्यामुळे बेस्टची सेवा मुंबईमध्ये पूर्णपणे कोलमडून पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. एकीकडे मुंबईकरांसाठी नव नवे पर्याय मुंबईत निर्माण होत असताना दुसरीकडे मात्र बेस्टची खरी लाईफ लाईन असलेल्या बेस्टला घरघर लागणे हे खऱ्या मुंबईकरांसाठी अत्यंत वेदनादायी असे आहे. या अगोदर बेस्टच्या कंत्राटदारांनी बस सेवा थांबवली असली तरी एवढा फरक पडत नव्हता कारण त्यावेळेस बेस्टचा स्वमालकीचा ताफा चांगल्या प्रमाणात होता. मात्र आता बेस्टचा मालकीचा ताफा १००० बस एवढा झाला आहे. त्यामुळे सध्या बंद पडलेल्या कंत्राटदाराच्या बसला कोणताही पर्याय नसल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. हंसा सिटी ग्रुपने साधारण आठ वर्षांपूर्वी २८० मिनी बस गाड्या देऊन आपली सेवा सुरू केली होती. या मिनी बसगाड्या मरोळ, ओशिवरा, दिंडोशी या तीन आगारांकडे होत्या. त्यामुळे अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड या स्थानकातून विनावाहक बस सेवा सुरू करणे बेस्टला शक्य झाले होते. पूर्वी या बस गाड्या वातानुकूलित होत्या मात्र दुरुस्ती अभावी सर्व बस गाड्यांच्या वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्या होत्या. तसेच बस गाड्यांची अवस्था ही आता बिकट झाली होती तसेच कंत्राटदाराला आता अतिरिक्त खर्च करणे न परवडत असल्याने तसेच कंत्राटामधील मूळ रक्कम ब प्रती किलोमीटर झालेला खर्च हे परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे त्यांनी वेळीच आपली बस सेवा कोणतीही अटी शर्तीची पूर्तता न करता थांबवली. आधीच बेस्टची अवस्था अत्यंत बिकट झाली असून ती आता बंद पडते की काय अशी अवस्था येऊन पोहोचली आहे. तिकीट दर कमी केल्यामुळे होणारी पूर्तता महापालिकेकडून मिळेल अशी आशा ठेवून असणाऱ्या बेस्टला आता मुंबई महापालिकेने नकारघंटा वाजवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वारंवार करवंटी घेऊन पालिकेच्या दारात बेस्टला अक्षरशः भिकाऱ्यासारखे उभे राहावे लागत आहे. मुंबई महापालिकेकडून बेस्ट उक्रमाला आजवरची संपूर्ण तुट भरून काढण्यासाठी आवश्यक निधीची पूर्तता करण्यात आलेली नाही. मागील काही वर्षांत तोट्याबाबत असे दिसते की, बेस्ट उपक्रमला हा संचित तोटा १२ हजार ९९.५५ कोटी झाला आहे हा तोटा मुंबई महापालिकेने देणे अनिवार्य आहे, मात्र मुंबई महापालिकेने आता हात वर केले आहेत. ११ जून १९१९ मुंबई महानगरपालिका यांच्या पूर्वसंमतीने बेस्ट उपक्रमाच्या वतीने महाव्यवस्थापक पेस्ट उपक्रम प्रोपेस्ट वर्कर्स यांनी केलेल्या सामाजिक सकारात बेस्ट उपक्रमात खासगी बस गाड्यांना परवानगी देण्यात आली होती. त्याचबरोबर उपक्रमाच्या सोमवारचा बसताफा तीन–तीन, सात एवढ्या राखण्यात येईल व त्याकरीता आवश्यक मनुष्यबळ नोकर भरती बेस्ट परफॉर्म मात केली जाईल असे धोरण निश्चित करण्यात आले होते. मात्र मुंबई महापालिकेने याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नाही त्यामुळे बेस्ट प्रकरणाच्या बसचा पुढील दोन वर्षांचा उपक्रम संपूर्णपणे बंद होईल व परिस्थिती बिकट होणार आहे. बेस्ट उपक्रमात खाजगी कंत्राटदारांच्या बस वाहतुकीस परवानगी मिळाल्यानंतर खासगी ठेकेदार कंपनीकडून बस सेवा सुरू करण्यात आले. सध्या परिस्थितीत बेस्ट उपक्रमाच्या ताब्यामध्ये स्वमालकीच्या १०४७ बस असून दीड हजारांहून जास्त बस या खासगी कंत्राटदाराच्या आहेत. आतापर्यंत तीन कंत्राटदार अचानक बाहेर पडले असून त्यांच्या बस गाड्यांची संख्या ही ८०० आहे. त्यामुळे अचानक रस्त्यावरून ८०० बस गाड्या गेल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहे. नवीन कंत्राटदारांच्या बसेस येत नाहीत. स्व–मालकीच्या बस गाड्या भंगारत जात आहेत त्यामुळे त्या कंत्राटदारांच्या व मालकीच्या बस गाड्यांवर प्रचंड ताण पडत आहे. कंत्राटदार सोडून गेलेल्या बस या विविध घरात धुळ खात पडून आहेत. या कंपन्यांमध्ये काम करणारे शेकडो तरुण मराठी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांवर बेरोजगारीचे संकट कोलमडलेले आहे. खासगी का कंत्राटी कंपन्यांकडून बसेस देखभाल योग्य प्रकारे होत नसल्यामुळे कंत्राटी बस सेवेत असताना अचानकपणे आग लागण्याच्या घटना वाढलेल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा जीव हा सुरक्षित नाही. ही बाब बेस्ट उपक्रमाच्या नावलौकिकास बाधा आणणारी आहे.

## विठुरायास आठ लाखांचा सोन्याचा तुळशीहार अर्पण



पंढरपूर – जालना येथील श्री दत्त आश्रम संस्थान यांच्याकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस सोन्याचा तुळशीहार अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदर हार ११७ ग्रॅम ४०० मिली वजनाचा असून त्याची सुमारे ८ लाख ३१ हजार इतकी किंमत होत आहे.

यापुर्वी देखील सदर संस्थानच्यावतीने श्री विठ्ठल रुक्मिणीस चांदी व सोन्याचे अनेक दागिने अर्पण केले आहेत. यावेळी विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी, संजय कोकीळ, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व सराफ गणेश भणगे उपस्थित होते.

## इंजिनिअरिंग पूर्ण झाल्यावर संशोधनात करिअर करा – शास्त्रज्ञ डॉ.नगरकर



पंढरपूर – करिअर करत असताना अपयश आले तरी हरकत नाही, परंतु प्रयत्न मात्र सोडू नयेत. इंजिनिअरिंग पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या शोधात असाल तर संशोधनामध्ये नक्की करिअर करा, असे आवाहन डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनवे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.अशोक नगरकर यांनी केले.

थोर शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ९३ व्या जयंती निमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या खुल्या रंगमंचावर वाचन प्रेरणा आणि जागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एन. बी. पासलकर हे होते. प्रास्तविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी ङ्गवाचन प्रेरणा दिनफ आणि ङ्गजागतिक विद्यार्थी दिनफ याबाबत माहिती दिली.

यावेळी ड्रीम फाउंडेशन, आचार्य चाणक्य गुरुकुल आणि डॉ.कलाम कौशल्य विकास केंद्र, पुणे यांच्यातर्फे ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक अशोक कोर्टीकर, पंढरपुरातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डी. वाय. ओंबासे व शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्धल प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांना ङ्गराष्ट्र उभारणी प्रेरणाफ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. एन. बी. पासलकर म्हणाले की, माझ्या जीवनात उद्योजक रतन टाटा आणि डॉ. अब्दुल कलाम यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यांनी आपल्या कार्यामध्ये टीमवर्क काय असते ते दाखवून दिले.

यावेळी बी.ए.आर.सी.चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.व्ही. के. सुरी, डॉ.विजय कुलकर्णी, विवेक वर्धिनी प्रशालेचे सेवानिवृत्त प्राचार्य राजेंद्र पाराध्ये, बिटरगावचे सरपंच बाबासाहेब धुमाळ, देविदास कसबे, गणेश यादव, धनंजय सालविठ्ठल, बी. डी.रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही. मांडवे उपस्थित होते.

## ध्यानात मनन

### सरश्री



शीर्षक वाचून एखाद्याला आश्चर्य वाटलं असेल. 'अरे! ध्यान करणं म्हणजे तर मेडिटेशन असतं. याचा मननाशी संबंध कसा? संबंध जोडला तरी मनन कसं केलं जाईल.' यासाठी प्रथम एक गोष्ट स्पष्ट व्हायला हवी, की आपण केवळ ध्यानासाठी बसतो तेव्हा त्याचा उद्देश निर्विचार अवस्था प्राप्त करणं हा असतो. तिथे विचारांची, मननाची आवश्यकता नसते. पण जेव्हा मनन–मंथन करण्याचा उद्देश असेल, तेव्हाही प्रथम ध्यानावस्थेत जायला हवं. त्यामुळे मनन करताना सकारात्मक बदल होऊ शकतील. तसंच आपल्या विचारात उत्साह येईल.

ध्यान आणि मनन वरवर पाहता भिन्न वाटत असलं तरी कुठेतरी त्यांचा निकटचा, गहिरा संबंध आहे. तुम्ही अनुभवलं असेल, की ध्यान केल्यामुळे मन शांत होतं. अशा वेळी चित्त एकाग्र होऊ लागतं व विचारांना योग्य दिशा देता येते. त्यामुळे विचार केल्यानंतर संतुष्टीचा भाव निर्माण होतो. मनुष्य शांतचित्त होऊन एखाद्या विशेष विषयावर सर्व बाजूंनी विचार करायला बसतो, तेव्हा त्याचं मनन खऱ्या अर्थाने यशस्वी होतं. तसंच मनाने इतर विचार सोडून एकाच दिशेने, एकाच मुद्द्यावर आपलं लक्ष केंद्रित करणं ही मनन करण्याची योग्य पद्धत आहे. मनुष्य ध्यानाला सुरुवात करतो तेव्हा त्याचं मन बऱ्याच वेळा अस्थिर असतं. एका विचारावरून दुसऱ्या विचाराकडे धावण्याची त्याची जुनी सवय असल्याने डोळे बंद होताच विचारांचा हल्ला सुरू होतो. कारण तोपर्यंत मन आणि बुद्धीचं संतुलन झालेलं नसतं. तरीही आपण नियमितपणे ध्यानात बसू लागलो तर हळूहळू मनाला ती सवय जडते. म्हणूनच प्रथम मन आणि शरीराला ध्यानात बसण्याची सवय लावावी लागेल.

एकदा शरीर आणि मन तसेच हृदय आणि मेंदू यांचं संतुलन होऊ लागलं की खरं ध्यान सुरू होतं. ध्यानाची एखादी आवडती पद्धत निवडून काही क्षण ध्यान केल्याने मन इकडे–तिकडे भरकटणं सोडून शांत होऊ लागतं आणि थोड्याच वेळात पूर्णपणे रिलॅक्स होतं. त्यानंतरच सखोल मननाचा लाभ घेता येऊ शकतो.

...तेजज्ञान फाउंडेशन
9921008060
helpdesk@tejgyan.org

## सोलापूर व सांगली पोलिसांची संयुक्त बैठक संपन्न

सांगोला – विधानसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व निवडणूक कार्यकाळात गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी सोलापूर व सांगली जिल्हा पोलीस यांची संयुक्त बैठक कमलापूर येथील सिंहगड कॉलेजवर संपन्न झाली.

सदर बैठकीत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांना सूचना केल्या. त्यामध्ये सोलापूर व सांगली जिल्ह्यातील सीमा भागातील सराईत गुन्हेगार, फरारी असलेले आरोपी यांना अटक करणे, अवैध व्यवसाय करणारे आरोपी, दारू व गांजाची वाहतूक आणि विक्री करणारे आरोपी यांच्यावर कारवाई करणे तसेच पोलीस ठाणे हद्दीतील सराईत आरोपी, गुंड प्रवृत्तीच्या इसमावर प्रतिकात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पोलिसांनी सतर्क राहून निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जनतेशी समन्वय वाढवावा अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, जतचे उपविभागीय अधिकारी सुनील साळुंखे, विटा येथील उपविभागीय अधिकारी विपुल पाटील, मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक महेश ढवान, कवठेमंकाळचे पोलीस निरीक्षक ज्योतीराम पाटील, सांगोल्याचे पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे, जतचे पोलीस निरीक्षक बिजली, उमदीचे संदीप कांबळे, आटपाडीचे रमेश जाधव, सांगोल्याचे सचिन जगताप व पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष–पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

# संजय साळुंखे यांना क्रांतीवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार प्रदान




पंढरपूर - धर्मांधांची आक्रमता सुनियोजित व संघटितरित्या चालु असून लव्ह जिहाद सारखे आक्रमण रोखण्यासाठी हिंदु समाजाने जागरुक राहिले पाहिजे तसेच मुला मुलींना धर्मशिक्षण देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सोलापूरचे हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते संजय साळुंखे यांनी केले.

गोवा मुक्तिसंग्रामामध्ये विलक्षण क्रांतिकार्य केलेल्या, पुरुषार्थ गाजवलेल्या क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा हिंदुत्व शौर्य पुरस्कार लव्ह जिहाद मध्ये अडकलेल्या माता-भगिनींची सुटका करणाऱ्या संजय साळुंखे यांना देण्यात आला. या प्रसंगी सांळुखे बोलत होते.पंढरपूरातील सद्गुरु गुंडा महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. चक्रीनाथ महाराज सिध्दरस यांच्या हस्ते तर ह.भ.प. लक्ष्मण महाराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी क्रांतिवीर बडवे न्यासचे अध्यक्ष अभयसिंह इचगावकर व मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना ह.भ.प.चक्रीनाथ महाराज सिध्दरस यांनी पौराणिक दाखले देत बलोपासना करीत धर्मरक्षण करण्यासाठी क्षात्रवृत्ती जागविण्याची गरज असून जातीविरहीत हिंदु समाजाने एकत्र येण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.या प्रसंगी ह.भ.प. लक्ष्मण महाराज चव्हाण बोलताना म्हणाले वारकरी संप्रदाय व हिंदुसमाज वेगळा असूच शकत नाहीत. प्रत्येक वारकऱ्याने व सांप्रदायिक महाराजांनी धर्मरक्षण राष्ट्ररक्षण यासाठी आपल्या किर्तन प्रवचनातून समाज जागृती करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमास सोलापूर हिंदुमहासभा अध्यक्ष सुधाकर बहिरवाडे,हिंदुत्ववादी कार्यकर्ते संजयकाका होमकर,मोहनराव मंगळवेढेकर,आनंद उत्पात आदी मान्यवर उपस्थित होते. पंढरपूर हिंदुमहासभेचे अध्यक्ष विकास मोरे यांनी आभार प्रदर्शन केले. आणि तुकाराम चिंचणीकर यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशांत खंडागळे,दिपक कुलकर्णी ओंकार वाटाणे, विठ्ठल बडवे, अनिकेत बडवे पंडीत भोले पुणेकर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# चालू गळीत हंगामा करिता ६.०० लाख मे.टना पेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट -उमेश परिचारक

## युटोपियन शुगर्सचे बॉयलर अग्निप्रदीपन उत्साहात

मंगळवेढा (प्रतिनिधी) : युटोपियन शुगर्सचे चालू गळीत हंगामा करिता ६.०० लाख मे.टना

पेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन चेअरमन उमेश परिचारक यांनी केले.

कचरेवाडी,ता.मंगळवेढा येथील युटोपियन शुगर्स लि. या कारखान्याच्या २०२४-२०२५ या अकराव्या गळीत हंगामाचे बॉयलर पूजन व अग्निप्रदीपन समारंभ सोमवार दि.२१/१०/२०२४ रोजी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या हस्ते अत्यंत साधेपणाने उत्साही वातावरणात संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी कारखान्याचे डे.चिफ इंजिनियर सुदर्शन बर्गे यांच्या हस्ते सपत्नीक सत्यनारायण महापूजा करण्यात आली.




यावेळी उमेश परिचारक म्हणाले,आपल्या कारखान्याचा हा अकरावा गळीत हंगाम असून मागील दहा हंगामात युटोपियनने भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात ६.०० लाख मे.टन ऊसाचे गाळप करून ऊसाच्या रसापासुन व बी हेवी मोलॅसेस पासून १.५० कोटी लिटर इथेनॉल उत्पादित करणार असलेचा मानस आहे. चालू गळीत हंगामात ऊसाची उपलब्धता चांगली असून गत दहा हंगामात ऊस उत्पादक हे युटोपियन कारखान्यास ऊस देण्यास प्राधान्य देतात व यापुढे हे देतील अशी मला खात्री आहे.

या गळीत हंगामात कारखान्याचे मार्गदर्शक,माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या सुचनेनुसार सांगोला-पंढरपूर-मंगळवेढा व मोहोळ या तालुक्यातील कारखान्याच्या सभासदांचा संपूर्ण ऊस गाळप केला जाईल. त्यामुळे ऊस उत्पादकांनी चिंता न करता कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन ही परिचारक यांनी करून कारखान्याने या वर्षी १० हार्वेस्टर मशिन घेतलेल्या आहेत तसेच २०० ट्रॅक्टर, १५० मिनी ट्रॅक्टर या प्रमाणे करार केल्याचे सांगीतले.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले,संपूर्ण ऊसाचे गाळप करण्यासाठी कारखाना यंत्रणा सज्ञ आहे. ऊस उत्पादक शेतकरी यांना दिवाळी सणासाठी प्रती किलो २५/- रु. प्रमाणे १० किलो साखर वाटप करणेत येईल. सर्व कामगार वर्ग हा चालू गळीत हंगाम यशस्वी करतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. सर्व कामगारांची दिवाळी गोड जाणेसाठी कामगारांना दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ८.३३ टक्के बोनस दिला जाईल. या कार्यक्रमासाठी कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी, खातेप्रमुख व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगणक विभागप्रमुख अभिजीत यादव यांनी केले.

# 'रयत क्रांती'च्या सहा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर



पंढरपूर - आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर येथे पंढरपूर, माढा, करमाळा, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला तालुक्यातील रयत क्रांती संघटना व रयत क्रांती पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

यावेळी सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा न्याय प्रत्येक मतदारसंघांमध्ये महायुतीचा घटक पक्ष म्हणून समन्वय समितीच्या नियुक्तत्या करण्यात आल्या. यावेळी रयत क्रांती संघटनेचे पंढरपूर विभाग प्रमुख नंदकुमार व्यवहारे, उपाध्यक्ष शंकर कवडे, पंढरपूर विभाग युवा अध्यक्ष रुपेश वाघ, युवा उपाध्यक्ष राहुल पवार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब बोबडे तसेच माढा तालुका पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. या बैठकीच्या निमित्ताने येणाऱ्या निवडणुकीमध्ये महायुतीचा घटक पक्ष म्हणून रयत क्रांती संघटनेच्या वतीने ठराव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसले, राज्य प्रवक्ते प्राध्यापक सुहास पाटील, पश्चिम महाराष्ट्र ओबीसी सेलचे अध्यक्ष हनुमंत गिरी, छगन पवार, सुनील पाटील, नेताजी नागणे, नागेश गायकवाड, जिल्हा संघटक बळीराम गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शिरनांदगीत म्हैसाळ कालवा फुटून पिकांचे नुकसान


मंगळवेढा - शिरनांदगी येथील म्हैसाळ योजनेचा कालवा फुटल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दोन वर्षे दुष्काळात होरपळलेल्या शेतकऱ्यांना यंदा सम ाधानकारक उत्पन्नाची अपेक्षा असतानाच कालवा फुटीने शेतीचे नुकसान झाले आहे.

तालुक्याच्या दक्षिण भागातील गावांना म्हैसाळचे पाणी दिले जाते. दरवर्षी या योजनेचे पाणी मागणी करून देखील वेळेवर दिले जात नव्हते. परंतु यंदा राज्यात समाधानकारक पाऊस झाल्याने पश्चिम महाराष्ट्रातील धरणे ओव्हरफ्लो झाल्यामुळे अतिरिक्त वितरिकांमार्फत सोडले जात आहे. यंदा मंगळवेढा तालुक्यात देखील म ान्सूनने वेळेवर हजेरी लावल्यामुळे बाजरी, तूर, मका, कांदा, सूर्यफुल या पिकाने शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

दक्षिण भागात म्हैसाळ कालव्यातून पाणी सोडले जात आहे. यापूर्वी कालव्यातून झालेली गळती व दुरुस्तीची कामे वेळेवर झालेली नाहीत. सांगली, मिरज कवठेम हांकाळ या भागात म्हैसाळच्या पाण्याची मागणी कमी असल्याने ते पाणी जत, सांगोला व मंगळवेढा तालुक्यात जास्त दाबाने सोडले जात आहे. यातच गळती झालेल्या ठिकाणी पाण्याचा दाब वाढल्याने कालवा फुटण्याचा प्रकार घडला आहे. यामध्ये शिरनांदगी परिसरात जवळपास ८० एकरहून अधिक शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक आंदाज आहे. त्यामध्ये सर्वाधिक नुकसान मका पिकाचे झाले आहे. याशिवाय कांदा व इतर फळ पिकांचे देखील नुकसान झाले असून सध्या राजकीय नेते निवडणुकीत गुंतल्याने या शेतकऱ्यांच्या बांधावर येण्यास त्यांना वेळ नाही.

# भारतीय हिंदराज सेनेचा दौरा महाराष्ट्रभर पंढरपुरातून प्राचाराचा शुभारंभ

पंढरपूर -भारतीय हिंदराज सेनेचा प्रचार दौरा महाराष्ट्रभर होणार असून पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार वैष्णवी दत्त यांच्या प्रचाराचा शुभारंभ आज पंढरपुरातील मुस्लीम कब्रस्तान मधून करणार असल्याची माहिती भारतीय हिंदराज सेनेचे संस्थापक धारासिंह राजपूत यांनी दिली.




सोलापूर - सोलापुर भारतीय हिंदराज सेना ही सर्व जाती धर्मांना घेवून काम करत आहे महाराष्ट्रामध्ये दलित समाज मोठया प्रमाणात असून मोजकेच आमदार आहेत. तसेच मातंग समाज, माळी समाज, कैकाडी धनगर समाज, माळी समाज, चांभार समाज, मातंग समाज, भटकें विमुक्त जातीमध्ये सर्व वस्तीमध्ये राहणे मुश्किल झाले असून भारतीय हिंदराज सेना ही सर्व समाजास न्याय देणार असून सर्वप्रथम ठेकेदारीवर आळा,मोफत आरोग्य दवाखाना, मोफत वैद्यकीय उपचारावर भर देणार असून भटकें विमुक्त जातीने भारतीय हिंदराज सेनेच्या पाठीशी उभे राहून भारतीय हिंदराज सेनेच्या अपक्ष उमेदवारास सहकार्य करावे असे आवाहन धारासिंह राजपूत यांनी केले आहे

# पोलिसांच्या सुट्ट्या, रजा २५ नोव्हेंबरपर्यंत रद्द! पोलिस महासंचालकांचे आदेश, होमगार्डसह पोलिस अधिकारी - कर्मचाऱ्यांना बंदोबस्ताची ड्युटी

सोलापूर : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील पोलिसांना बंदोबस्ताची ड्युटी असणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पोलिस अंमलदार व अधिकाऱ्यांना १५ ते २५ नोव्हेंबर या काळात सुट्ट्या व रजा मिळणार नाहीत.पोलिस महासंचालक कार्यालयाने त्यासंबंधीचे आदेश काढले आहेत.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. मंगळवारपासून (ता. २२) उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होणार असून त्यासाठीही पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. ५ ते १८ नोव्हेंबर या काळात प्रचारसभा, कॉर्नर बैठका होतील. २३ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा निकाल जाहीर होईल. निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी प्रत्येक मतदारसंघात पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार आहे.

**विधानसभा निवडणुकीसाठी बंदोबस्ताचे नियोजन**

**पोलिस महासंचालक कार्यालयाच्या आदेशानुसार १५ ते २५ नोव्हेंबर या काळात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व पोलिस अधिकारी व अंमलदारांच्या सुट्ट्या, रजा रद्द करण्यात आल्या आहेत.**

**- अजित बोऱ्हाडे,**
**पोलिस उपायुक्त, सोलापूर शहर**

पोलिसांच्या मदतीला होमगार्ड, राज्य राखीव पोलिस बलाचेही कर्मचारी असणार आहेत. राज्यातील जवळपास दीड लाख पोलिस, ४७ हजार होमगार्ड व राज्य राखीव पोलिस बलाच्या तुकड्यांनाही विविध ठिकाणी बंदोबस्त दिला जाणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांच्या ठिकाणी पोलिसांचा ज्यादा बंदोबस्त असणार असून काही ठिकाणी नवप्रविष्ठ पोलिसांनाही बंदोबस्ताची ड्युटी दिली जाणार आहे. त्याचे नियोजन जिल्हा पोलिस अधीक्षक, पोलिस आयुक्तांच्या माध्यमातून सुरू आहे.

**विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर निवडणुकीसाठी नेमलेल्या सर्वच शासकीय विभागाच्या कर्मचाऱ्यांचे तालुकानिहाय प्रशिक्षण पार पडणार आहे. मतदानाच्या १० ते १२ दिवस अगोदर प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पार पडणार आहे. दरम्यान, शिक्षकांना २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत दिवाळी सुटी असणार आहे. पण, त्यांना येत्या शनिवार, रविवारी तालुकानिहाय प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे लागणार आहे. त्यानंतर १० नोव्हेंबरपूर्वी पुन्हा एका प्रशिक्षणाला उपस्थित राहावे लागणार आहे. त्यामुळे शिक्षकांच्या दिवाळीच्या सुट्ट्या इलेक्शन कामातच जाणार आहेत.**

# दोन्ही देशमुखांसह सचिन कल्याणशेट्टींना भाजपची उमेदवारी जाहीर



सोलापूर – लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर भाजपने पुन्हा एकदा प्रस्थापितांना उमेदवारी देत भाकरी फिरवण्याचे टाळले आहे. सोलापुरातील मातब्बर असलेल्या दोन देशमुखांना पुन्हा एकदा संधी मिळाली आहे. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांना, सोलापूर दक्षिण मतदारसंघातून माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, अक्कलकोटमधून भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर भाजपने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

भारतीय जनता पक्षाची विधानसभा निवडणुकीसाठी ९९ उमेदवारांची पहिली यादी रविवारी जाहीर झाली आहे. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांना, तर सोलापूर दक्षिण मतदारसंघातून माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्यावर पक्षाने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. तसेच, भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांना अक्कलकोटमधून उमेदवारी देत देवेंद्र फडणवीस यांनी आपली जुनी टीम कायम ठेवली आहे.

सोलापूर शहर उत्तर आणि दक्षिण सोलापूर मतदारसंघातून दोन्ही देशमुखांना भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उमेदवारी देण्यास विरोध दर्शवला होता, त्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीच्या संदर्भात भाकरी फिरवली जाईल, अशी चर्चा सुरू असतानाच जाहीर झालेल्या यादीत सोलापूर शहर उत्तर मतदासंघातून विजयकुमार देशमुख यांना, तर दक्षिण सोलापूरमधून सुभाष देशमुख यांना उमेदवारी देण्यात

सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातून विजयकुमार देशमुख हे सलग चार वेळा निवडून आले आहेत. ते आता पुन्हा पाचव्यांदा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून सुभाष देशमुख हे सलग दोन वेळा निवडून आले आहेत. ते आता तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. भाजपचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांना पुन्हा संधी देत देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मर्जीतील लोकांना पुन्हा एकदा विधानसभेत जाण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.



# होलार समाजाच्या वतीने मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा सन्मान

मंगळवेढा (प्रतिनिधी) : तालुक्यातील मरवडे येथे होलार समाज बांधवांच्या वतीने पंढरपूर–मंगळवेढा विधान सभामतदार संघाचे उमेदवार, मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी होलार समाजातील ज्येष्ठ नागरिक,युवक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी होलार समाज बांधवांच्या वतीने ज्येष्ठ मंडळींच्या हस्ते दिलीप बापू धोत्रे यांचा सन्मान मोठ्या उत्साहात करण्यात आला.

यावेळी होलार समाजाने आपला माणूस दिलीप धोत्रे आमदार होणार असा आशीर्वाद दिला. यावेळी दिलीप धोत्रे यांनी होलार समाज बांधवांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न जाणून घेऊन लवकरच सोडवले जातील असा विश्वास देत समाजाच्या अडीअडचणी असतील तर माझ्याशी संपर्क साधा असे आवाहन दिलीप बाबू धोत्रे यांनी यावेळी केले.

यावेळी होलार समाजाचे प्रदेश अध्यक्ष रणजित ऐवळे,नेते हैदर केंगार,शिवाजी केंगार,शंकर ऐवळे,किसन भजनावळे,रतिलाल केंगार, नानासाहेब हेगडे,मधुकर भंडगे,बाळासाहेब जावीर,पांडुरंग गेजगे यांचेसह हजारोंच्या संख्येने होलार समाज बांधव, भगिनी उपस्थित होते.

# करकंब धान्य घोटाळ्यातील तत्कालीन तहसीलदारांसह ६ जण निर्दोष

पंढरपूर : संपूर्ण राज्यभर गाजलेल्या करकंब येथील शासकीय गोदामातील धान्य घोटाळा आणि दप्तरातील अफरातफरीच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी तत्कालीन तहसीलदार अजय पवार, गोदामपाल प्रभाकर रोकडे यांच्यासह ६ जणांची अखेर निर्दो ष मुक्तता करण्यात आली. तब्बल १७ वर्षांपूर्वीच्या या खटल्याचा निकाल येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस.ए.साळुंखे यांनी दिला.

तत्कालीन गोदामपाल प्रभाकर रोकडे,तहसीलदार अजय पवार, पुरवठा निरीक्षक ईश्वरलाल वरवडकर,महसूल विभागाचे अधिकारी बाळकृष्ण बळवंतराव,बबन तारापूरकर,शाहू कदम तसेच ठेकेदार शैलेश धोत्रे व प्रभाकर भांडेकर अशा ८ जणांविरुद्ध हा गुन्हा दाखल झालेला होता. खटला सुरू असताना वरवडकर व भांडेकर हे दोघे मयत झाले. १ ऑक्टोबर २००४ ते ११ सप्टेंबर २००६ या कालावधीत तत्कालीन तहसीलदार पवार यांच्यासह अधिकारी,कर्मचारी आणि ठेकेदारांनी संगनमत करून करकंब येथील शासकीय धान्य गोदामात असलेले विविध योजनांमधील लाभार्थींना वितरणासाठी असलेले गहू,तांदुळ, रिकामा बारदानांची बेकायदेशीररित्या विल्हेवाट लावून अपहार केला. पुरावा नष्ट करण्यासाठी पंढरपूर गोदामातील धान्य परस्पर करकंब गोदामात पाठविले,असा आरोप होता. फिर्याद तत्कालीन जिल्हा पुरवठा विभागाचे सहा. लेखाधिकारी सुनील चव्हाण यांनी तालुका पोलीस ठाण्यात ३१ जानेवारी २००७ रोजी दाखल केली होती. या खटल्याची अंतिम सुनावणी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साळुंखे यांच्यासमोर झाली. सरकार पक्षातर्फे २० साक्षीदार तपासण्यात आले. यात मुख्य आरोपी प्रभाकर रोकडे यांच्या तर्फे ॲड. विजयकुमार जाधव,तर अजय पवार यांच्यातर्फे ॲड.इंद्रजीत परिचारक यांनी युक्तीवाद केला. युक्तीवाद आणि सर्व बाबींचे अवलोकन करून न्यायालयाने आरोपींची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली.

यात मुख्य आरोपी प्रभाकर रोकडे यांच्या तर्फे ॲड. विजयकुमार जाधव,तर अजय पवार यांच्या तर्फे ॲड.इंद्रजीत परिचारक यांनी कामकाज पाहिले.

# न्याय आपल्या दारी': तालुक्यात फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिर

पंढरपूर (प्रतिनिधी): समाजातील तळागाळातील लोकांना न्याय मिळावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्वोच्च न्यायालय यांच्या न्याय आपल्या दारी' या संकल्पनेतून सुरू केलेल्या फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिराचे आयोजन राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशान्वये पंढरपूर तालुक्यातील गोपाळपुर, वाखरी व गुरसाळे या गावांमध्ये दि. २५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत करण्यात आलेले आहे.

फिरते लोक आदालत तालुक्यातील गोपाळपुर, वाखरी व गुरसाळे गावात फिरून न्यायालयात प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत. तसेच कायदेविषयक शिबिराद्वारे जनजागृती केली जाणार आहे. सदर फिरते लोक अदालत यशस्वी करण्यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी सहकार्य करावे व जास्तीत जास्त लाभ घेवून तडजोड योग्य प्रकरणे आपसात मिटवावी असे आवाहन तालुका विधी सेवा अध्यक्ष समिती, तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डि. एन. सुरवसे यांनी केले आहे.

# ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना अटक अन् सुटका

पंढरपूर : ओबीसी आंदोलक प्रा.लक्ष्मण हाके यांना पंढरपूर पोलिसांनी धनादेश अनादर प्रकरणी अटक केली आहे. या प्रकरणी त्यांना तातडीने जिल्हा सत्र न्यायालयापुढे हजर केले असता कोर्टाने त्यांची जामिनावर सुटका केली. लक्ष्मण हाके यांची विजया इन्फ्रा कंपनी आहे. या कंपनीने सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीस २०२१ साली ३ लाख रुपयांचा धनादेश दिलेला होता. तो बाऊन्स झाल्यानंतर सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीने लक्ष्मण हाके यांच्या विरोधात तक्रार केली होती.

# तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये पंढरपूर तालुक्यात सर्व शाळांमधये जळोली शाळेचे वर्चस्व

करकंब –जिल्हा परिषद प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी जिल्हा परिषद सोलापूर आयोजित पंढरपूर पंचायत समिती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली शाळेने घवघवीत यश संपादन करत पंढरपूर तालुक्यात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

वैयक्तिक स्पर्धेत त्यामध्ये कथाकथन लहानगट स्पर्धेत श्रेया महादेव नरसाळे तर मोठा गट सायली शिंदे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. निबंध स्पर्धेत मोठा गट उपासना अमोल नरसाळे हिचा द्वितीय तर वक्तृत्व स्पर्धेत मोठा गट द्वितीय क्रमांक स्वरांजली सुनिल नरसाळे मिळवत सामुहिक स्पर्धेमध्ये सुध्दा मोठ्या गटात समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम तर लोकनृत्य मोठा गटात द्वितीय क्रमांक मिळवत समूहगीतात निबंध,वक्तृत्व,कथाकथन यामध्ये सोलापूर जिल्हास्तरीय होणाऱ्या स्पर्धेत निवड झाली असून पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली शाळेने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. व्यक्तिमत्व विकासाबरोबरच गुणवत्ता ही तितकीच उत्तम असून सर्व शिक्षक एकदिलाने काम करत आहेत. लवकरच क्रिडा स्पर्धे चीही तयारी सुरू केली आहे.खरोखरच हे यश पाहता विद्यार्थ्यांना श्रीमती देवकी कलढोणे–दुधाणे यांचे अथक परिश्रम व अनमोल मार्गदर्शन लाभले.

पंढरपूर तालुका पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे,स्पर्धा केंद्रप्रमुख काळुंके केंद्रप्रमुख पा.वा. जाधव,जळोली गावचे सरपंच.जोतिराम मदने,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब नरसाळे, उपाध्यक्ष शहाजी नरसाळे,स्थानिक संस्था प्रतिनिधी समाधान नरसाळे,ज्येष्ठ नेते कांतिलाल नरसाळे,संतोष नरसाळे,अनेक ग्रामस्त,माता पालक यांनी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी आणि शिक्षकांचे अभिनंदन करत जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. हे यश प्राप्त करण्यासाठी मुख्याध्यापक गणपत मोरे,सोमनाथ पवार,रमेश खारे,अभिमन्यू लोंढे,शिवाजु गोरे,कैलास नरसाळे,जयवंत कापसे, देवकी कलढोणे –दुधाणे यांनी परिश्रम घेतले.

# लोकमाता अहिल्यादेवींचे प्रशानकार्य प्रेरणादायी : डॉ.सुवर्णा गुंड

## उमा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पंढरपूर : लोकमाता ही अहिल्यादेवी होळकर यांना प्रजेनं दिलेली पदवी अतिशय सार्थ ठरली आहे. अहिल्यादेवींनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रजेलाच नव्हे तर अखंड हिंदुस्थानला एक राजनैतिक वारसा दिला आहे. प्रजेला आपल्या मुलाप्रम णे कसं सांभाळायला हवं तसेच प्रजाहितदक्ष कसं असावं तसंच धमपरायनतेसाठी राष्ट्राच्या हितासाठी, पुर्ण राष्ट्रात मंदिरांचं संवर्धन,दानधर्म,धर्मशाळा उभारल्या,धर्मरक्षणही केलं. यासाठी शस्त्रापेक्षा शास्त्राचा कौशल्याने उपयोग केला. यासाठी आपल्या प्रजेकडून जादाचा कर न घेता त्यांनी आपल्या खासगीतून जो पैसा मिळे त्यातून त्यांनी हे सर्व पुण्यकर्म केले होते. त्यामुळं त्यांना पुण्यश्लोक,धर्मरक्षक,लोकमाता या पदव्या लोकांनी बहाल केल्या असे प्रतिपादन उदाहरणासह प्रोफेसर डॉ सुवर्णा गुंड–चव्हाण यांनी केले.

श्री पांडुरंग प्रसारक मंडळ संचालित,उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,



पंढरपूर यांच्यावतीने आयोजित केलेल्या आभासी पटलाद्वारे समस्त विद्यार्थ्यांना प्रबोधित करताना त्या बोलत होत्या.

यावेळी त्यांनी,सैन्याला कुमक पुरविणे, टपाल व्यवस्था, भिल्ल समाज व गोंड समाजासाठीची ध्येय धोरणे. राज्य व्यवस्था, न्यायव्यवस्था इत्यादीची उदाहरणांसह मांडणी केली. आजच्या सर्व महिलांनी याचा आपल्या जीवनात व कामकाजात आदर्श घ्यावा याचे मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित आयोजिका व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विद्युल्लता पांढरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अहिल्यादेवी यांचे कार्यावर प्रो. डॉ. सुवर्णा गुंड यांनी सर्वच स्तरातून व पातळीवर लोकमाता अहिल्यादेवी यांच्या केलेल्या कार्याची जी मांडणी केली. त्यामुळे अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेता. ते कसे आपणास कसे उपयुक्त ठरते यास दुजोरा दिला.

याप्रसंगी उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह डॉ.मिलिंद परिचारक, जनसंपर्क अधिकारी सूर्यकांत पारखे,प्रा.विलास बंडगर,प्रा.सविता दुधभाते, बीएड प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक तनुजा सुपले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.जे.एस.बागवान यांनी करुन दिला. सूत्रसंचालन स्मिता जाधव यांनी केले. आभार प्रथमेश शेटे यांनी मानले.

# विधानसभेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर व जिल्ह्यातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी तयार

सोलापूर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण पोलिसांनी शहर व जिल्ह्यातील रेकॉर्डवरील जवळपास आठ हजार सराईत गुन्हेगारांची पोलिस ठाणेनिहाय यादी तयार केली आहे. या सर्व गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई,तडीपारी,एमपीडीए यासारखी कारवाई करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिसांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली असून त्यातील सुमारे ५००० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई,१४० जणांविरुध्द तडीपारी,४० जणांवर एमपीडीएची कारवाई प्रस्तावीत करण्यात येणार आहे. तसेच सोलापूर शहर पोलिसांनी रेकॉर्डवरील २८०० गुन्हेगारांची यादी तयार केली असून त्यातील २७५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ६० जणांविरुध्द तडीपारी तर ५ जणांविरुध्द एमपीडीएची कारवाई प्रस्तावीत करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २२ ते २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. ३० ऑक्टोबरला अर्जाची छाननी होवून अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल. त्यानंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. त्या दिवसापासून उमेदवारांना पुढे १८ नोव्हेंबरपर्यंत प्रचार करता येईल. २० नोव्हेंबरला म तदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या काळात पोलिसांचे त्यांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर लक्ष राहणार आहे. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही गुन्हा केल्यास पुढे त्यांच्यावर स्थानबद्धतेची किंवा तडीपारीची कारवाई होवू शकते. त्यामुळे सर्वांनी शांतता पाळावी, लोकशाहीचा उत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे. डणूक काळात सामाजिक शांतता व 'सुव्यवस्थेला बाधा होईल, असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल. रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालींवर पोलिसांचे नेहमीच लक्ष असते,पण निवडणूक काळात विशेष लक्ष राहणार आहे.